**प्रलंबित भूसंपादन प्रकरणांमध्ये मा. न्यायालयासमोर बाजू प्रभावीपणे मांडणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: - बैठक-२०२६/प्र.क्र. १००/भूसंपादन-०२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०५.०६.२०२६

वाचा - मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.०४.२०२६ रोजी पार पडलेली बैठक.

**प्रस्तावना -**

मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने प्रथम अपिल क्र. ६९६/२००४ माणिकचंद फुलपगार विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा. न्यायालयाने दि.११.०३.२०२६ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये भूसंपादन संस्थेची बाजू मांडण्याकरीता भूसंपादन संस्थेचे विधी अधिकारी वारंवार मुदतवाढ देऊनही उपस्थित राहत नसल्याबाबत नाराजी व्यक्त करुन विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबत मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.०४.२०२६ रोजी पार पडलेल्या बैठकीमधील भूसंपादन प्रकरणांमध्ये भूसंपादन संस्थेची बाजू मा. न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडण्यासाठी खालीलप्रमाणे सर्वसमावेशक सुचना देण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक :-**

१. भूसंपादन प्रकरणांमध्ये निवाडा अंतिम झाल्यानंतर मा. न्यायालय/प्राधिकरणासमोर दाखल प्रकरणांमध्ये संबंधित भूसंपादन संस्था व प्रशासकीय विभागांनी अशा प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन बाजू मांडण्याकरीता तयार करण्यात आलेल्या पॅनलमधील विधी अधिकाऱ्यांची नेमणूक तसेच बाजू मांडण्याबाबत आवश्यक त्या सुचना देण्याची विभागाच्या स्तरावरुन तातडीने कार्यवाही करावी. याशिवाय अशा प्रकरणांमध्ये विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी.
२. तत्कालीन भूसंपादन अधिनियम १८९४ खालील कलम १८, २८ व ३४ तसेच भूसंपादन अधिनियम, २०१३ कलम ७२ व ८० खालील प्रकरणांमध्ये निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा. न्यायालयाने पारीत केलेले आदेश विचारात घेऊन त्याबाबत आवश्यकतेनुसार निधी मागणीचे उचित प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनास तातडीने सादर करणे.
३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांबाबतची मा. जिल्हा न्यायालय, मा. उच्च न्यायालयासमोरील भूसंपादनाशी निगडीत प्रलंबित प्रकरणे मा. न्यायालयाचे आदेश याबाबतची माहिती वेळोवळी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच भूसंपादन अधिनियम २०१३ खालील स्थापन करण्यात आलेल्या छत्रपती संभाजीनगर, नाशिक,नागपूर, अमरावती या प्राधिकरणासमोरील भूसंपादनाबाबतचे प्रलंबित दावे याबाबत दरमहा वाढावा प्राधिकरणाची स्थापना, कार्यालयीन बाबींचे कामकाज हाताळणाऱ्या मदत व पुनर्वसन उपविभागाने घ्यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६०५१४५५४२१७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN SITARAM METKARI

Digitally signed by MITHUN SITARAM METKARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=C5E8236705FDBCCA44E2729131D7F8ECF3D89986EF302C333A751DB3D8202DE1, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F9CC4741E617C7D288990243652309A7CD19A13FD383DEF17B5669F6F383A116, cn=MITHUN SITARAM METKARI
Date: 2026.06.05 14:56:44 +05'30'

**( मिथुन मेटकरी )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्यांक ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (वने, भूसंपादन), मंत्रालय, मंबई.
७) अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मंबई.
८) अपर मुख्य सचिव (नगरविकास विभाग) मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव (विधी व न्याय विभाग) मंत्रालय, मुंबई
१०) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व भूसंपादन संस्था व त्यांचे संबंधित प्रशासकीय विभाग.
१२) सर्व प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण.
१३) व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, मुंबई
१४) उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
१५) मुख्य अभियंता, मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे व इतर रेल्वे विभाग.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) सर्व जिल्हाधिकारी.
१८) निवडनस्ती (भूसंपादन-०२)